# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः08.09.2025** **वारःसोमवार**

---

1. रामोशी-बेडर समाजाला दोन लाख रुपयांचे विनातारण कर्ज देण्याचा निर्णय
2. नमो युवा रन उपक्रमांत 10 लाख युवक सहभागी होण्याची शक्यता
3. गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान विविध ठिकाणी ११ जण बुडाले  आणि
4. आशिया हॉकी करंडक भारतानं जिंकला

**<u>राजे-उमाजी-नाईक</u>**

स्वातंत्र्य लढ्यात अद्वितीय योगदान देणारे राजे उमाजी नाईक यांची 234वी जयंती काल राज्यभरांत विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. रामोशी-बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून दोन लाख रुपयांपर्यंतचे बिगर तारण कर्ज, तसेच समाजात उद्योजक आणि व्यावसायिक घडावेत यासाठी 15 लाख रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. रामोशी समाजाच्या विकासासाठी यापुढेही सहकार्य करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातल्या भिवडी इथल्या क्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या स्मारकस्थळी आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते.

ते म्हणाले-....

मंत्रालयात कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**राज्य-अधिवेशन**

भारतीय कर्मचारी संघ आणि स्वाभिमानी संघ यांच्याद्वारे आद्य क्रांतिवीर उमाजीराजे नाईक यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र तसंच कर्नाटक राज्याचं पहिलं संयुक्त राज्य अधिवेशन काल सांगली इथं पार पडलं. दोन सत्रांमध्ये पार पडलेल्या या अधिवेशनाला भारतीय कर्मचारी संघाचे अध्यक्ष डी. आर. ओहोळ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**नमो-युवा-रन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १७ सप्टेंबरला असलेल्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने २१ सप्टेंबरला देशभरातील ७५ ठिकाणी नमो युवा रन या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनी दिल्लीत काल कार्यक्रमाची माहिती दिली. या उपक्रमात दहा लाखाहून अधिक तरुण सहभागी होणार आहेत. याबद्दलची अधिक माहिती देताना मनसुख मांडवीय म्हणाले –

……

अभिनेते मिलिंद सोमण या उपक्रमाचे सदिच्छा दूत म्हणून सहभागी होणार आहेत. युवकांनी तंदुरुस्त रहावं, आरोग्याची काळजी घ्यावी आणि अमली पदार्थांपासून दूर रहावं यासाठी जागृती करण्याचा या उपक्रमाचा उद्देश असून 10 लाख युवक सहभागी होण्याची शक्यता असल्याचं भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष तेजस्वी सुर्या यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

**GST**

वस्तू आणि सेवा करमधील व्यापक सुधारणा सहकारी क्षेत्राला बळकटी देतील, उत्पादने अधिक स्पर्धात्मक होतील, उत्पादनांची मागणी वाढेल आणि सहकारी संस्थांचे उत्पन्न वाढवेल असा विश्वास सहकार मंत्रालयानं काल व्यक्त केला.  जीएसटी सुधारणा ग्रामीण उद्योजकता आणि अन्न प्रक्रिया क्षेत्रातील सहकारी संस्थांना प्रोत्साहन देतील आणि लाखो कुटुंबांना आवश्यक वस्तू परवडणाऱ्या दरांत उपलब्ध होतील. देशातील १० कोटींहून अधिक दुग्ध उत्पादकांना फायदा होईल, शाश्वत कृषी प्रणालींना चालना मिळेल आणि लहान शेतकऱ्यांना लाभ होईल असंही मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनांत म्हटलं आहे.  जीएसटी सुधारणांचे मोठ्या सहकारी ब्रँडसह संपूर्ण दुग्ध सहकारी क्षेत्राने कौतुक केले आहे. महिलांच्या नेतृत्वाखालील ग्रामीण उद्योगांना, विशेषतः दूध प्रक्रियेत गुंतलेल्या स्वयंसहाय्यता गटांना बळकटी मिळेल. असा विश्वासही मंत्रालयानं व्यक्त केला आहे.

**<u>मिरवणूक</u>**

पुण्यातील वैभवशाली गणेश विसर्जन मिरवणूक काल दुपानंतर संपली.

मिरवणुकीत तसंच मिरवणुका संपवून परतणाऱ्या अनेक मंडळांच्या डीजेच्या दणदणाटानं आणि ढोल-ताशा पथकांच्या वादनानं सर्वत्र आवाजाची मर्यादा ओलांडल्याचं दिसून आलं.

पुणे पोलीस विघ्नहर्ता न्यासाच्या वतीने यंदा मुख्य गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक मार्गावर, अहोरात्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा देण्यात आली. याचा लाभ  सातशे २२ जणांनी घेतला. या रुग्णामध्ये ५२ पोलीस बांधवांचा समावेश असून  तातडीच्या उपचारासाठी ४८ रुग्णांना विविध रुग्णालयात दाखल करण्यात आल. पिंपरी चिंचवड शहरातली विसर्जन मिरवणूक वेळेत आटोपली.

**<u>बुडाले-वाहून-गेले</u>**

नाशिक शहरासह जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी नदीपात्रात विसर्जन करण्यासाठी उतरलेले चारजण बुडाले असून त्यांचा शोध घेतला जात आहे. वाशीम जिल्ह्यातील, मानोरा तालुक्यात  सेवादासनगर येथील युवक विसर्जन करण्यासाठी अरूणावती नदी तीरावर गेला असता, नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची घटना घडली.

नांदेड जिल्ह्यात, नांदेडजवळील गाडेगाव इथं शनिवारी सायंकाळी आसना आसना नदीत तिघेजण बुडाले होते. त्यातील एका तरुणाला शोधण्यात आले तर दोघेजण मात्र अद्यापही बेपत्ता आहेत. या दोघांचाही शोध घेतला जात आहे.

जळगाव जिल्ह्यात गणेश विसर्जनासाठी गेलेले चार जण ठिकठिकाणी पाण्यात बुडाल्याचे उघडकीस आले. यापैकी यावल तालुक्यातील पाझर तलावात बुडालेल्या एकाचा आणि जामनेर तालुक्यातील कांग नदीत बुडालेल्या एकाचा मृतदेह सापडला आहे. मात्र, जळगाव तालुक्यातील गिरणा नदीत बुडालेल्या दोघांचा शोध काल सायंकाळी उशिरापर्यंत लागला नाही.

महाराष्ट्र शासनानं गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला असून शनिवारी रात्री गिरगाव चौपाटीवर विसर्जन सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उपस्थित राहून गणरायाला निरोप दिला.राज्यात दहा दिवसांचा गणेशोत्सव उत्साहात आणि शांततेत पार पडल्याच मुख्यमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

**<u>निर्माल्याचे संकलन</u>**

पुण्यात स्वच्छच्या चारशेहून अधिक कचरावेचकांनी गणेश उत्सवादरम्यान ५० हून अधिक विसर्जन घाट आणि मूर्ती संकलन  केंद्रांवर निर्माल्य टू निसर्ग हा उपक्रम राबवला. त्यात नागरिकांकडून ११४ टन निर्माल्याचे संकलन करून त्याचं वर्गीकरण करत त्यातून ३९ टन सुका कचरा स्वतंत्र केला.

संकलित निर्माल्य पुणे महानगरपालिकेकडे खतनिर्मितीसाठी देण्यात आले असून कचरावेचकांनी निर्धाराने आपली बांधिलकी जपत, रात्री उशीरापर्यंत थांबत निर्माल्य संकलनाचे काम सुरू ठेवल होतं. मुंबईतही काल विविध चौपट्यांवर अनेक संस्था, संघटनांनी स्वच्छता मोहीम राबवली.

**<u>मुख्यमंत्री-समृद्ध-पंचायत</u>**

हिंगोली तसेच रत्नागिरीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान जिल्हास्तरीय कार्यशाळा काल पार पडली.. गावोगावचे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामरोजगार सहाय्यक आदी यावेळी उपस्थित होते. राज्यातील सर्व ग्रामपंचायत स्तरावर 17 सप्टेंबर ते 31 डिसेंबर या कालावधीत समृध्द पंचायत अभियान राबवले जाणार आहे. उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना शासनातर्फे बक्षीसे देण्यात येणार आहे.

**<u>हॉकी</u>**

आशिया चषक पुरुष हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीतील रोमहर्षक सामन्यात भारतीय संघानं काल गतविजेत्या दक्षिण कोरियाच्या संघावर ४ विरुद्ध एका गोलनं असा विजय मिळवत चौथ्यांदा या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं. बिहारमध्ये राजगीर इथं झालेल्या या अंतिम सामन्यातील विजयानं भारतीय हॉकी संघ पुढच्या वर्षी, २०२६ मध्ये नेदरलँड्सआणि बेल्जियममध्ये होणाऱ्या FIH पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठीही पात्र ठरला आहे. हॉकी इंडियानं प्रत्येक खेळाडूला ३ लाख रुपये तर सामन्याच्या सहाय्यक चमूला प्रत्येकी दीड लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं आहे. आशिया चषक विजेत्या भारतीय पुरुष संघाचं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अभिनंदन केलं आहे.

**<u>हवामान</u>**

विदर्भात तुरळक ठिकाणी वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अन्यत्र पावसाच्या हलक्या सरी अपेक्षित आहेत.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**